क्र. पोमसं/३-अ/१०/जीटी-१७/पोनि (श्वान )२७/२०१७
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई- ४०० ००१.
दिनांक :- १०/०४/२०१७.

वाचा :- १) महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१
२) आस्थापना मंडळ क्र. २ यांचे दि. १०/०४/२०१७ च्या बैठकीचे इतिवृत्त

## आदेश

महाराष्ट्र पोलीस कायदा कलम २२ न (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी कायद्याप्रमाणे विहीत कालावधी पूर्ण झालेल्या पोलीस निरीक्षक (श्वान) यांचे पदस्थापनेस खालीलप्रमाणे मान्यता दिली आहे. :-

| अ.क्र. | पोलीस निरीक्षकांचे नांव | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण | बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | अशोक सुकाजी वाघ | श्वान प्रशिक्षण केंद्र, गुअवि, पुणे | आहे त्या पदावर एक वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे. |

२. संबंधीत घटक प्रमुखांनी या आदेशांची प्रत आणि बदली ठिकाणी कार्यमुक्त करण्यात आलेल्या आदेशांची प्रत, उक्त पोलीस निरीक्षकांना व्यक्तिश: अदा करुन, त्या आदेशांच्या दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवून, त्या पोंच या कार्यालयास सत्वर सादर कराव्यात.

३. संबंधीत घटक प्रमुखांनी **उपरोक्त बदली आदेशाधिन असलेल्या उक्त पोलीस निरीक्षकांना बदलीवर सोडताना पर्यायी/ बदलीवर येणा-या पोलीस निरीक्षकांची वाट न पाहता, बदलीवरील नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.** तसेच, सदर पोलीस निरीक्षकांना बदलीवर कार्यमुक्त केल्याचा दिनांक संबंधीत घटक प्रमुखांनी, **या कार्यालयास दिनांक ३१/०५/२०१६ पुर्वी (कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन)** निश्चितपणे कळवावा.

४. उपरोक्त आदेशान्वये पोलीस निरीक्षक (श्वान) यांची बदली ज्या घटक कार्यालयात दर्शविण्यात आली आहे, तेथे सदर पोलीस निरीक्षक (श्वान ) हजर होण्याची जबाबदारी बदलून गेलेल्या ठिकाणच्या पोलीस घटक कार्यालयाची राहील, याची नोंद घ्यावी. त्यासाठी त्यांनी पाठपुरावा करावा. विहित वेळेत हजर न होणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

५. संबंधीत घटक प्रमुखांनी, **त्यांच्या घटकात बदलून येणारे जे पोलीस निरीक्षक या आदेशांनुसार बदलीवर नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणार नाहीत, त्यांची नावे** कृपया या कार्यालयास **कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन** फॅक्सद्वारे कळवावीत. तसेच, **त्यांच्या घटकातून बदलून जाणारे जे पोलीस निरीक्षक बदलीवर हजर होण्याचे टाळून रुग्णनिवेदन करतील, अशा पोलीस निरीक्षकांनाही त्यांनी रुग्णनिवेदन केलेल्या**

**दिनांकापासून बदलीवर कार्यमुक्त केल्याचे (deemed relieved) दर्शविण्यात यावे,** आणि त्याबाबतचा स्वतंत्र अहवालदेखील या कार्यालयास **कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन** फॅक्सद्वारे सत्वर सादर करावा. तसेच, संबंधीत घटक प्रमुखांनी **अशा संबंधीत पोलीस निरीक्षकांविरुध्द या कार्यालयाचे पत्र क्र. २/५५/०७, दि. १६/०९/१९८३, दि. ११/०१/१९८४, व दि. १०/०२/१९९१, तसेच परिपत्रक क्र.पोमसं/३/५५०७/६/९, दि. १३/०२/१९९७ मधील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी, व तसाही अनुपालन अहवाल या कार्यालयास कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन सत्वर सादर करावा.**

६. पदस्थापनेच्या आदेशांची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व संबधीत घटक प्रमुखांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

७. सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर **FLASH** या शिर्षाखाली देखील उपलब्ध आहेत.

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक गु.अ.वि., म.रा., पुणे

**प्रत सविनय सादर :-**

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग,
दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-**

महालेखापाल-१, मुंबई (सस्नेह)

प्रत :-

कार्यासन अधिकारी, का.क्र. २, १६, ३६ व ४०.